दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १०५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.९ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कर्नाळा अभयारण्य पर्यटकांसाठी खुले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कोविडच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पर्यटकांसाठी बंद करण्यात आलेले कर्नाळा अभयारण्य पर्यटकांसाठी पुन्हा खुले करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी घेतला आहे. यामुळे विशेषतः ट्रेकर्ससाठी आनंदाची बातमी असुन कर्नाळा किल्ल्यावर ट्रेकर्सना पुन्हा एकदा ट्रेक करता येणार आहे.**





कर्नाळा अभयारण्य हे नेहमीच पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू राहिले आहे. मुंबई उपनगरातुन मोठ्या प्रमाणात पर्यटक याठिकाणी येत असतात. यामध्ये ट्रेकर्सचा मोठा सहभाग आहे. मुंबईच्या अगदी जवळ पनवेल शहरालगत असलेल्या कर्नाळा अभयारण्यात परिसरात पक्ष्यांच्या सुमारे १५० स्थानिक व सुमारे ३७ स्थलांतरित प्रजाती आढळून येतात. येथे कोतवाल, हळदी, टकाचोर, लिफबर्ड छोटा सूर्यपक्षी, राखाडी धनेश, मोर, चातक, साळुंकी, सातभाई, हरियाल (हिरवे कबूतर) इत्यादी वर्षभर दिसणारे सर्वसामान्य पक्षी असून वैशिष्ट्यपूर्ण पक्ष्यांमध्ये स्वर्गीय नर्तक, भृंगराज कोतवाल, गोमेट पर्वतकस्तुर यांचा उल्लेख करता येईल. समुद्री घार, ससाणा, घुबड हे येथील शिकारी पक्षी आहेत. तसेच येथे हिवाळ्यामध्ये स्थलांतरीत पक्षी देखील पहावयास मिळतात. या व्यतिरिक्त कर्नाळा अभयारण्य विभिन्न पक्ष्यांबरोबरच रानडुक्कर, ससे, माकडे, रानमांजर, भेकर, कोल्हा, मुंगूस, साळींदर, वानरांच्या काही जाती व क्वचित एखादा बिबट्या या अभयारण्यात आढळतात. वेगवेगळ्या जातींचे विषारी व बिनविषारी सर्प, सरडे देखील येथे सापडतात.अभयारण्यासह कर्नाळा किल्ला व तेथील सुळका हे देखील पर्यटकांचे आकर्षण राहिले आहे.

कर्नाळा किल्ल्याचे शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात देखील एक वेगळी ओळख राहिली आहे. त्यामुळे या वास्तुला ऐतिहासिक महत्व असल्याने अनेक इतिहास संशोधक आवर्जुन याठिकाणी येत असतात. अशा सर्वानाच हे पर्यटन स्थळ सुरु होत असल्याने याठिकाणी मुक्त संचार करता येणार आहे.

कोविड नियमांचे पालन करून या ठिकाणी पर्यटकांना वावरता येणार असले तरी सकाळी ७ ते सायंकाळी ११ वाजेपर्यंत पर्यटकांना प्रवेश असणार आहे. अभयारण्यात प्रवेश करताना मास्क घालणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

### अभयारण्य बंद असल्याने लाखोंचे नुकसान

जवळ जवळ वर्षभरापासून कर्नाळा अभयारण्य बंद, चालु आहे. यामुळे अभयारण्य व्यवस्थापनाचे देखील मोठे नुकसान झाले आहे. हे नुकसान लाखोंच्या घरात आहे. पर्यटकांना प्रवेश देताना आकारली जाणारी फी, पार्किंग फी आदींसह निवासस्थानाचे भाडे पर्यटकांकडून वसुल केले जाते. मात्र पर्यटकांना प्रवेश बंदी असल्याने अभयारण्य प्रशासनाचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

### स्थानिकांना मिळणार रोजगार


मागील कित्येक महिन्यांपासून कोविडमुळे अभयारण्य बंद असल्याने या ठिकाणी बचत गटाद्वारे उपहार गृह चालवणाऱ्या महिलांचा रोजगार हिरावला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा हे अभयारण्य सुरु करताना भोजन व नावासस्थानाची देखील परवाणगी दिल्याने पुन्हा एकदा स्थानिक महिला बचतगटांना रोजगाराची संधी मिळणार आहे.

> कोविडचे नियम पाळुन पर्यटकांना अभयारण्य परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे. याकरिता आम्ही प्रवेशद्वारावरच पर्यकांची तपासणी करणार आहोत. कर्नाळा किल्ल्यावर ट्रेकर्सना प्रवेश दुपारी दोन पर्यंत असणार आहे. पर्यटकांनी कोविडच्या नियमांचे पालन करावे.
>
> **पी पी चव्हाण (वनपरिक्षेत्र अधिकारी, कर्नाळा अभयारण्य )**

# कोरोनाविरोधी लढाईसाठी केंद्राची २३ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नव्या केंद्रीय मंत्रिमंडळाची आज पहिली बैठक झाली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. हे निर्णय कृषी आणि आरोग्य क्षेत्रासंबंधित आहेत. मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात पहिला मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर नव्या मंत्रिमंडळाची ही पहिलीच बैठक होती. यात बाजार समित्या बळकट करण्यासोबतच नारळ बोर्ड कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. भविष्यात करोना महामारीचा सामना करण्यासाठी २३ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा करण्यात आली आहे.




बाजार समित्या बंद होणार नाहीत. तर त्यांना अधिक बळकट केले जाईल. एपीएमसी अजूनही १ लाख कोटींच्या पायाभूत सुविधांच्या निधीचा उपयोग करत आहे, असं केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्र सिंह तोमर म्हणाले. केंद्र सरकारच्या तीन नवीन कायद्यांविरोधात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना यातून संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कृषी कायद्यांविरोधात आंदोलन करत असलेल्या शेतकऱ्यांशी सरकार चर्चेसाठी तयार आहे. कायद्यांच्या प्रत्येक बाजूने चर्चा करेल. पण हे कायदे मागे घेतले जणार नाही, असं तोमर यांनी स्पष्ट केलं.

देशात मोठ्या प्रमाणावर नारळाची शेती होती. नारळाचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि त्यात सवलत देण्यासाठी १९८१ ला नारळ बोर्ड कायदा आणण्यात आला होता. आता या कायद्यात सुधारणा केली जाणार आहे. बोर्डाचा अध्यक्ष हा गैर सरकारी असेल, असं तोमर यांनी सांगितलं. कृषी उत्पन्न बाजार समित्या या बंद होणार नाही. तर त्यांना अधिक बळ दिले जाईल, हे अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आले होते. बाजार समित्यांना आणखी संसधानं मिळावीत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कृषी इन्फ्रस्ट्रक्चर फंडला स्वावलंबी भारत नुसरा १ लाख कोटी रुपये देण्यात आले आहे. या फंडचा उपयोग APMC करेल, अशी माहिती तोमर यांनी दिली.

एखादी व्यक्ती एकहून अधिक योजनेनुसार ( २५ योजनांची मर्यादा आणि वेगवेगळ्या स्थानावर असतील) काम करत असेल तर त्याला प्रत्येक योजननेच्या वेगवेगळ्या २ कोटी रुपयांच्या व्याजावर सूट आणि हमी पत्र दिले जाईल, असं कृषी मंत्री म्हणाले.

> भविष्यातील करोनाच्या कुठल्याही आव्हानाचा सामना करण्यासाठी २३ हजार कोटी रुपयांचे पॅकेज आणले जाईल. केंद्र सरकार १५ हजार कोटी देईल आणि राज्य सरकारे ८ हजार कोटी रुपये देतील. ७३६ जिल्ह्यांमध्ये पीडिएट्रीक युनिट बनवण्यात येतील. २० हजार आयसीयू बेड तयार केले जातील. एप्रिल २०२० कोविडच्या पहिल्या पॅकेजमध्ये १५ हजार कोटी रुपये देण्यात आले होते. कोविड हॉस्पिटल्स १६३ वरून वाढवून ती ४३८९ केली जातील. ऑक्सिजन बेडची संख्या ५० हजारांवरून ४ लाख १७ हजार ३९६ इतकी केली जाईल, असं नवीन आरोग्यमंत्री मनसुख मांडविय यांनी सांगितलं.

# नोकरीच्या आमिषाने तरुणाची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नोकरी डॉट कॉम या वेबसाईटवर वडिलांसाठी नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणाला सायबर चोरट्यांनी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देऊन त्याच्याकडून २४,६९८ रुपये उकळल्याची घटना उघडकिस आली आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांच्या टोळीवर फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील पारदार सोनलकुमार सिंग हा कामोठे सेक्टर-२१ मध्ये राहण्यास असून सध्या तो शिक्षण घेत आहे. सोनलकुमारचे वडिल आर्मीमधुन निवृत्त झाले असल्याने तसेच त्यांना नोकरीची गरज असल्याने सोनलकुमारने सिक्युरिटी सुपरवायझर या पदाच्या नोकरीची शोधा-शोध सुरु केली होती. त्यासाठी सोनलकुमार याने गत जुन महिन्यामध्ये नोकरी डॉट कॉम या वेबसाईटवर सुद्धा वडिलांची माहिती टाकली होती. दरम्यान, काही दिवस-ातच किर्ती एके नावाच्या महिलेने सोनलकुमार याला संपर्क साधून जॉब फॉर नोकरी डॉट कॉम या नावाची तीची एजन्सी असल्याचे तसेच सदर एजन्सीमार्फत मोठमोठ्या .../२

## संक्षिप्त...

### १ तासांतनर एकनाथ खडसे ईडी कार्यालयातून बाहेर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुण्यातील भोसरी जमीन घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालय (ईडी) कार्यालयात माजी महसूलमंत्री व राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांची आज नऊ तास मॅरेथॉन चौकशी झाली. आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास खडसे ईडी कार्यालयात चौकशीसाठी हजर राहिले होते. खडसे यांचे वकील प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना म्हणाले, आम्ही ईडीच्या अधिकाऱ्यांना सहकार्य केले. काही कागदपत्रे देखील दिली. यापुढे जेव्हा कधीही ईडी बोलवेल तेव्हा आम्ही हजर राहू असे देखील वकील पुढे म्हणाले.

एकनाथ खडसेंचे जावई गिरीश चौधरी यांना अटक केली. पुण्यातील भोसरी जमीन घोटाळा प्रकरणात मंगळवारी सुमारे १३ तास चौकशी केल्यानंतर अटक करण्यात आली होती. ईडी न्यायालयाने त्यांना १२ जुलैपर्यंत कोठडी सुनावली आहे. यानंतर एकनाथ खडसेंना चौकशीसाठी समन्स पाठविले होते. यावर खडसेंनी ही राजकीय हेतूने प्रेरित कारवाई असल्याचा आरोप केला. तसेच आपण ईडीला सहकार्य करणार असून त्यांना हवी असलेली माहिती मी देणार आहे. परंतू मला यात राजकीय वास येत आहे. माझ्या माहितीप्रमाणे हा भूखंड खासगी आहे. एमआयडीसीने सांगावे की तो भूखंड आपला आहे, जमीन मालकाला मोबदला दिला आहे, असे सांगितल्यास मी दोषीच असेन. कुछ तो होने वाला है, असे मेसेज जळगावात फिरत आहेत. पातच वर्षांपूर्वीचे प्रकरण पुन्हा काढले, मला अडकविण्याच प्रयत्न असल्याचा आरोप खडसे यांनी केला आहे.

# मोदी सरकारचे नवे मंत्रालय सहकार क्षेत्र वाचविण्यासाठी उपयुक्त : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या इतिहासात प्रथमच केंद्र सरकारमध्ये सहकार मंत्रालयाची निर्मिती केली असून त्याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे सोपविली आहे. त्यांचा हा निर्णय महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र वाचविण्यासाठी आणि त्यावर अवलंबून असलेल्या सामान्य लोकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी व्यक्त केली.



आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, मोदी सरकारने मंगळवारी नव्या सहकार मंत्रालयाची निर्मिती करण्याचा निर्णय जाहीर केला तर बुधवारच्या मंत्रिमंडळ फेरबदलात या नव्या मंत्रालयाची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या समर्थ नेतृत्वावर सोपविली आहे. नवे मंत्रालय हे सहकार क्षेत्रासाठी ईज ऑफ डुईंग बिझनेस - व्यवसाय सुलभता निर्माण करण्यास आणि मल्टी स्टेट सहकारी संस्थांसाठी उपयुक्त ठरेल, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे.

सहकार क्षेत्राला सध्या फार मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत असून या क्षेत्रालाही व्यवसाय सुलभता मिळण्याची गरज आहे, यावर मोदी सरकारने भर दिला हे महत्त्वाचे आहे.

त्यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या निर्णयामुळे राज्यातील सहकार क्षेत्राला केंद्र सरकारच्या धोरणांचे आणि कायद्यांचे पाठबळ मिळेल. त्यामुळे या क्षेत्राला आर्थिक शिस्त निर्माण करण्यास आणि सध्याच्या आव्हानांवर मात करण्यास मदत होईल. सहकार क्षेत्रावर अवलंबून असलेल्या असंख्य सामान्य शेतकरी आणि ठेविदारांच्या हिताचे मोदी सरकारच्या निर्णयामुळे रक्षण होईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

# बोकडविरा येथील धोकादायक पुलावरील अवजड वाहतूक बंदीचे हाईट बॅरिकेट समाजकंटकानी तोडले

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील उरण - पनवेल रस्त्यावर फुंडे सिडको कार्यालयाजवळील बस थांब्यावरील पूल धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने घोषित केले असून, तशा प्रकारे बोर्डही बाजूला लावण्यात आला आहे.



धोकादायक पुलावरून अवजड वाहने चालून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने बोकडविरा एमएसईबी कॉलनी जवळ लावलेले लोखंडी हाईट बॅरिकेट समाज कंटकांनी एकाच दिवसात तोडल्याचे कृत्य केले आहे.

पनवेल - उरण रस्त्यावर सिडकोने बांधलेला सिडको कार्यालया जवळील हा पुल धोकादायक असल्याने सिडकोच्या स्ट्रक्चरल विभागाने रिपोर्ट दिला होता. त्या अनुषंगाने येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने अवजड वाहतुकीस बंदी असल्याचे बॅनर लावले होते. तरीही येथून अवजड वाहतूक सुरूच होती.

या धोकादायक पुलावरून अपघात होऊ नये या दृष्टिकोनातून काल ७ जुलै २०२१ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाने हाईट बॅरिकेट लावले होते. मात्र एका दिवसातच काही समाजकंटकानी हे बॅरिकेट जाणून बुजून पाडले आहे. त्यामुळे या बाबत त्वरीत कायदेशिर कारवाई करण्यात यावी अशी मागणी वाहनचालक व पादचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# मुरुड समुद्रकिनारी प्लास्टिक कचरा वाहून आल्याने आरोग्यास व पर्यावरणास धोका

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड समुद्रकिनारी पावसाळ्यामध्ये अधूनमधून येणाऱ्या वादळ सदृश्य परिस्थितीमुळे व समुद्रातील भरतीच्या वेळी किनाऱ्यावर प्लास्टिकचा कचरा अधिक प्रमाणात वाहून येत असल्याचे आढळून आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील समुद्र किनारपट्टीवर प्लास्टिक प्रदूषणाची गंभीर समस्या जाणवत आहे. या प्लास्टिक मध्ये कार्बन, इथेनॉल ऑक्साईड, झायलीन, बेन्झील इत्यादी रासायनिक विषारी घटक असतात. या प्लास्टिकचे छोटे तुकडे मासे गिळतात ते माश्यांच्या आरोग्यास हानिकारक असतात व या मास्यांच्या सेवनाने मनुष्याच्याही आरोग्यास धोका संभवतो असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.



मासेमारी करताना जाळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक सापडते. त्यामुळे मच्छिमारांचे फार मोठे नुकसान होत असल्याचे एस टी एम एम मच्छिमार संघाचे समन्वयक प्रकाश सरपाटील यांनी सांगितले. यावर उपाय म्हणून केरळ सरकारने ज्याप्रमाणे 'शुचित्व सागरम' हि योजना राबवली त्याचे अनुकरण इतर राष्ट्रांनी केल्यास समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. या योजनेत कोळ्यांच्या जाळ्यात .../२

# कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तविली जात असल्याने नागरिकांनी दक्ष रहावे : निधी चौधरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पुढील काही दिवसात कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तविली जात आहे.



रायगड जिल्ह्याचा सध्याचा पॉझिटिव्हिटी रेट दहा टक्क्यांपेक्षा खाली आहे . परंतु कोविड-१९ निर्देशांचे पालन न केल्यास हा पॉझिटिव्हीटी दर वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी गर्दी करणे, बाजारपेठांमध्ये गर्दी करणे, अनावश्यक बाहेर पडणे, मास्क न वापरणे यामुळे जिल्हयातील रुग्णांची संख्या वाढू शकते, ती वाढू नये,यासाठी जिल्हा प्रशासन व पो-लीस प्रशासनाच्या वतीने कोविड-१९ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यात येत आहे.

या कारवाईमध्ये १ एप्रिल २०२१ ते ३० जून २०२१ या कालावधीत पोलिस प्रशासनाकडून रक्कम रुपये १ कोटी ३२ लाख व ग्रामपंचायत तसेच नगरपालिका यासारख्या स्थानिक प्रशासनाकडून रु.२१ लाख ५६ हजार ४५० अशी एकूण रु.१ कोटी ५३ लाख ५६ हजार ४५० एवढी .../२

# खैराटवाडी येथे आदिवासींसाठी रानभाज्या प्रदर्शन व विक्री महोत्सव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्लयाच्या परिसरात असलेल्या आदिवासी बांधवांना अर्थार्जनाचे साधन म्हणून युसुफ मेहेरअली सेंटर आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभागातील समाजकार्य प्रशिक्षणार्थींनी खैराटवाडी येथे रान भाज्या प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन केले होते



प्रकल्प संचालक सुरेश रासम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महोत्सवात महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाचे निवृत्त उपसचिव प्रकाश दुधलकर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाचे सतीश शेरमकर,राधिका वाणी, ज्योती वाघ, पनवेल तालुका कृषी अधिकारी ईश्वर चौधरी, कृषी सहाय्यक पी.बी.बोराडे, व्ही.यु. पाटील, प्रसाद पाटील, कृषि मित्र लक्ष्मण पाटील ग्रामपंचायत सदस्य तुलसा बाई हापसे, सुनीता वाघमारे, युसुफ मेहर अली सेंटरचे रामदास गुरमे बाळकृष्ण सावंत मालती म्हात्रे अंजना पवार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते या प्रदर्शनात आदिवासी बांधवांनी जंगलातील कुरडू, भारांगा, शेवाळा, बाफळी, टाकळा, तेरी, माठ, कंटोळी, करांदे यासारख्या रानभाज्या विक्रीस ठेवल्या होत्या दरम्यान यावेळी युसुफ मेहेरअली सेंटरच्या वतीने उपस्थित आदिवासी महिलांनी रानभाज्या विक्री केंद्र चालविण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कडून आर्थिक मदततीचे अर्ज प्रकल्प अधिकाऱ्यांकडे दिले तर कृषी विभागाकडून आदिवासी शेतकऱ्यांना तुरीचे बियाणे वाटप करण्यात आले सदर महोत्सवाचे आयोजन तथा नियोजन समाजशास्त्र पदवीचे शिक्षण घेणारे विध्यार्थी सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, दत्ता शिरसाट, पराग गावडे, शंकर अलदे यांच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन केले.

# चिरनेर येथील आरडीसी बँकेकडून बचतगटातील महिलांना मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । उरण**

नाबार्ड स्थापना दिनाचे औचित्य साधुन, राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अलिबाग यांच्या संयुक्त विदयमाने चिरनेर बँक शाखा अंतर्गत आर्थिक आणि डिजिटल कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी बँकेचे उरण तालुका निरिक्षक रुपेश म्हात्रे, चिरनेर बँकेचे शाखाधिकारी मदन कोळी, बँकेचे कॅशिअर अजित थळे, बँक क्लार्क अस्मिता उंदीरे, चंपा बचत गटाच्या कलावती केणी, चमेली बचत गटाच्या अनिता घरत, सौभाग्य बचत गटाच्या लता पाटील, व संसार बचत गटाच्या मिनाक्षी पाटील, कर्मचारी व तालुक्यातील बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

याप्रसंगी कार्यक्रमात उरण तालुका निरिक्षक रुपेश म्हात्रे यांनी मनोगतामध्ये बँकेचे चेअरमन आमदार जयंत पाटील यांनी बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविले असून, महिलांना सदरचे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन आर्थिक स्वावलंबी होऊन, आपल्या कुटूंबासाठी, आर्थिक हातभार लावावा असे मनोगत म्हात्रे यांनी व्यक्त केले. तर चिरनेर बँक शाखेचे शाखाधिकारी मदन कोळी यांनी महिलांना मार्गदर्शन करतांना, बँकेचे चेअरमन जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाने बचत गटातील सलग्न महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण व अन्य उपक्रम राबविले.


दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तीचे मालक श्री.जुगदिप कुमार सेहगल, रा.मुंबई यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिखली भोम, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.जुगदीप कुमार सेहगल | १ | १/क | ०-२९-००<br>पो.ख.०-०२-००<br>एकूण ०-३१-० | ३-२५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०९/०७/२०२१
स्थळ : उरण

सही/-
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८०९७१०८०६०**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तीचे मालक श्री.बलराज जुगदिपकुमार सेहगल, रा.मुंबई यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबुसरे, ता.उरण, जि.रायगड**

| धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.बलराज जुगदिपकुमार सेहगल यांच्या नावे असलेली | ७४ | ५ | ०-७९-०० पैकी<br>०-४०-५०<br>पैकी ०-२०-५० | १-७५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, गहाणखत, वहिवारंग, वहिवाट, किवकिवडा, हक्कहितसंबंध वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधची व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून सदरचा कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०९/०७/२०२१
स्थळ : उरण

सही/-
**ॲड.योगेश नामदेव म्हात्रे**
**रा.कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.८०९७१०८०६०**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नोकरीच्या आमिषाने तरुणाची फसवणूक

नामांकित कंपन्यामध्ये नोकरी मिळवून देण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या वेबसाईटवर माहिती भरुन फॉर्मसोबत असलेला क्युआर कोड स्कॅन करुन २६९९ रुपये पाठविण्यास सांगितले. त्यानुसार सोनलकुमारने सदर रक्कम पाठवुन दिल्यानंतर दुसऱया दिवशी मनीश पॉल नामक व्यक्तीने त्याला संपर्क साधुन त्याच्या वडिलांचे नोकरीसाठी रजिस्ट्रेशन झाल्याचे सांगितले. तसेच कागदपत्र पडताळणीसाठी ७९९९ रुपये व कन्फर्मेशन साठी १३९९९ रुपये चार्जेस लागतील असे सांगून सदर रक्कम पाठविण्यास सोनलकुमारला भाग पाडले. त्यानंतर मनिष पॉल याने लवकरच मुलाखातीसाठी कॉल येईल असे सांगून फोन बंद केला. मात्र सोनलकुमारच्या मोबाईलवर नोकरी संदर्भात कुठल्याही प्रकारचा कॉल आला नाही. त्यामुळे त्याने काही मित्रांकडून सदर वेबसाईटबाबत माहिती घेतली असता, सदरची वेबसाईट बोगस असल्याचे सोनलकुमारला समजले. त्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## आरोग्यास व पर्यावरणास धोका

सापडलेल्या प्लास्टिकचे वर्गीकरण करून त्याचे बारीक तुकडे केले जातात व त्याचा वापर रस्ते तयार करण्यासाठी अस्फाल्टला पर्याय म्हणून केला जातो. महाराष्ट्रामध्ये समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण होण्यामागे मुख्यत्वे किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ, परिणामी किनाऱ्यालगतचे हॉटेल व्यवसाय , छोटे मोठे स्टॉल तसेच जवळपास असणारे कारखाने काही प्रमाणात कारणीभूत असल्याचे बोलले जाते. शासनातर्फे प्लास्टिक बंदीचा निर्णय लादल्याने काही प्रमाणात त्याचा फायदा होत आहे. महाराष्ट्रातील किनारपट्टीवर स्थानिक स्वराज्य संस्था, काही सेवाभावी संस्था, शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या मार्फत हा कचरा उचलला जातो. परंतु पानमसाल्यासारखी छोटी पाकिटे, छोटे प्लास्टिकचे तुकडे उचलले जात नाहीत. प्लास्टिकचे छोटे तुकडे शोधून काढण्याची यंत्रणा कार्यान्वित करावी तसेच सरकारने नागरिकांच्या सवई बदलण्यासाठी जनजागृतीसाठी उपाययोजना करून प्लास्टिक प्रदूषणावर मात करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## नागरिकांनी दक्ष रहावे : निधी चौधरी

दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे.

तसेच पुढील काही दिवसात कोविड-१९ च्या तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तविली जात असल्याने नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी गर्दी करु नये तसेच अनावश्यक कारणासाठी बाहेर पडण्यात येऊ नये, बाहेर पडताना मास्कचा वापर करण्यात यावा, नियमांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर आपत्ती व्यवस्था कायदा २००५ व भा.द.वि. १८६० प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, त्यामुळे नागरिकांनी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी केले आहे.

# भूजल संवर्धनासाठी लोकसहभाग महत्वाचा : डॉ.किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पाणी ही मानवाची मूलभूत गरज आहे त्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी सर्वांनी सक्रीय सहभाग घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज येथे केले. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षांच्या निमित्ताने भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अलिबाग रायगड व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रायगड जिल्ह्यातील भूस्तरीय रचना व पाऊस पाणी संकलन व पाणी गुणवत्ता या विषयांवरील जिल्ह-स्तरीस ऑनलाईन वेबिनार मध्ये ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील म्हणाले की, रायगड जिल्हा हा जरी जास्त पर्जन्यमानाच्या विभागात मोडत असला तरीही येथील भौगोलिक रचनेमुळे पावसाचे पाणी वाहून जाते. परिणामी दुष्काळ व पाणी टंचाई प्रश्नास सामोरे जावे लागते. पावसाळ्यात पडणाऱ्या प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून पाण्यांचे संकलन करणे व त्याव्दारे भूजल पुनर्भरण करणे आवश्यक आहे. यासाठी तालुकास्तरांवर गटविकास अधिकारी यांनी योग्य नियोजन करावे. पाणी बचत तसेच टंचाई निवारणासाठी लोकसहभागातून पाणी स्त्रोत बळकटीकरण तसेच तलावातील गाळ काढण्याची कामे भूजल संवर्धनांकरिता प्रत्येक शासकीय तसेच खाजगी इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे, बोअर वेल रिचार्ज, वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन इ. कार्यक्रमही हाती घेतला पाहिजे. पाण्याच्या शुदधतेसाठीची जाणीव व पाण्याचा योग्य वापराविषयीचे ज्ञान याकरिता ग्रामपंचायतस्तरांवर याविषयी जनजागृती होणे गरजेचे आहे यासाठी जास्तीत जास्त लोकसहभाग आवश्यक आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वेबिनारचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, यांनी सांगितले की ज्याप्रमाणे राज्य हागणदारीमुक्त झाले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक नागरिकाला स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होण्यासाठी सर्वांनी सांघिक प्रयत्न करणं आवश्यक आहे. भूजल संवर्धनासाठी लोकसहभाग घ्यायला हवा.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता डॉ. ज्ञानदा फणसे यांनी पाणी गुणवत्ता नियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, ग्रामपंचायत विभाग, आरोग्य विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सर्वानी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे, असे सांगितले. वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अलिबाग-रायगड श्री. एच. एम. संगनोर यांनी शास्त्रोक्त पदधतीने जलसंवर्धन करणे पाणलोट क्षेत्र रायगड जिल्हयातील भूस्तरीय रचना व पाऊस पाणी संकलन या विषयांवर संगणकीय सादरीकरणाव्दारे सविस्तर मार्गदर्शन केले. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे रासायनिक व अणुजैविक पाणी नमुने तपासणी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी योग्य पद्धतीने नियमित शुदधीकरण प्रक्रिया याबाबत श्रीमती एस. एस. पासलकर कनिष्ठ रसायनी, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा कोकण भवन यांनी उपस्थितींना मार्गदर्शन केले. तर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.जयवंत गायकवाड यांनी पाणी शुध्दीकरणाच्या विविध पध्दती व त्यामध्ये ग्रामपंचायतीची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.

या वेबिनार करिता सर्व गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत) ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, BRC,CRC व जलसुरक्षक दूरचित्रवाणीच्या माध्यमांतून उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही १) किरण मधुकर बोरसे, २) मनोज रामानंद प्रजापती यांचे नांवे महसूल दप्तरी ७/१२ सदरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नढाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) किरण मधुकर बोरसे<br>२) मनोज रामानंद प्रजापती | १६०/३ | ०-२७-५० | २.०० |
| यापैकी मनोज रामानंद प्रजापती यांचे हिश्श्याचे विक्री क्षेत्र ०-१३-७५ हे.आार. इतकी मिळकत | | | |

मौजे : नढाळ, ता.खालापूर, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक मनोज रामचंद्र प्रजापती यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०-१३-७५ हे.आर. ही शेत जमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.०८/०७/२०२१**

सही/-
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.१०१, बी विंग, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**प्लॉट नं.५६, ठाणा नाका रोड, पनवेल**
**मो.नं.८२८६१२१३३३**

मे.मुजावर साहेब

ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७१७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/०८/२१

श्री.सिबलु रामसुभाग पांडे
वय : ३५, धंदा : व्यापार
रा.के.एल.६, बिल्डींग नं.६, रुम नं.५,
सेक्टर ३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील म्हणजेच मयत कै.रामसुभाग पांडे यांची कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील सदनिका आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सदनिका क्र. | क्षेत्र | इमारतीचे नांव | सेक्टर, प्लॉट नं. |
|---|---|---|---|
| पहिला मजला | ५४.०३ चौ.मी. बिल्टअप | के.एल.-६/६/१:५ | रुम नं.०५, बिल्डींग नं.६, सेक्टर ३ ई, कळंबोली |

अर्जदारांचे वडील कै.रामसुभाग पांडे यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्ज वर पॅरा नं.५ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.रामसुभाग पांडे व मयत कै.रामलली रामसुभाग पांडे यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.रामसुभाग पांडे व मयत कै.रामलली रामसुभाग पांडे यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ७/७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.अश्विनी जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७६६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०९/२१

१) श्रीमती.अनिता दत्तात्रय चव्हाण
वय : ३४ वर्षे, धंदा : घरकाम
२) कु.ऋतिका दत्तात्रय चव्हाण
वय : १६ वर्षे, धंदा : विद्यार्थी
३) कु.विघ्नेश दत्तात्रय चव्हाण
वय : ११ वर्षे, धंदा : विद्यार्थी — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार १ चे पती आणि अर्जदार २ व ३ चे वडील कै.दत्तात्रय छगन चव्हाण हे दि.०६/०७/२०२० रोजी कामोठे, नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. मयत व्यक्ती हे शिक्षक या पदावर रायगड जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत होते. सबब मयत यांचे निवृत्ती वेतन व इतर शासकीय लाभदेयक कर्मचारी वेतन मिळण्यासाठी कै.दत्तात्रय छगन चव्हाण यांचे कायदेशीर वारस असल्याचा सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्यासाठी अर्जदार ह्यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सक्सेशन सर्टिफिकेट कामी कोणत्याही, कसल्याही हरकती असल्यास सदरची हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभात वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.८/७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मे.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
निलेश द. हातमोडे
आकाश उ. डोंगरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (ज्यु.डी.) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७४८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०८/२१

१) श्री.तुषार विश्वासराव कदम
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.आशिष विश्वासराव कदम
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
१ व २ रा.३०२, अंबिका आर्केड,
लोखंडीपाडा, सावरकर चौक,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.वनिता विश्वासराव कदम ह्या वीर हॉस्पिटल पनवेल येथे दि.२८/०६/२०१९ रोजी मयत झाले आहेत. कै.वनिता विश्वासराव कदम यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पनवेल येथे बँक खाते आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पनवेल**
**पब्लिक प्रोविडेंट फंड अकाऊंट**
**खाते क्र.११०३५४३२८८२**
**सिआयएफ नं.८०८३५९६६३६५**
**सदर खात्यामध्ये रक्कम रुपये २१,२९,४४२/- (अक्षरी एकवीस लाख एकोणतीस हजार चारशे बेचाळीस रुपये मात्र) एवढी रक्कम जमा आहे.**

अर्जदार हे वरील बँक खात्यासंदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आ-हेत. अर्जदार यांच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट १) श्री.तुषार विश्वासराव कदम व २) कु.आशिष विश्वासराव कदम ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व ते अर्जदार कै.वनिता विश्वासराव कदम यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वारस दाखला मजूर करेल. आज दि.०८/०७/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## गाळा विकणे आहे

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ग्रामपंचायतींच्या दिवाबत्तीची वीज पूर्ववत करावी

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण मधील ज्येष्ठ साहित्यिक व संपादक बाळ सिंगासने यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन निवृत्त शिक्षक व साहित्यिक पिंगळे सर तसेच पेण शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कवी, कला साहित्यिक बाळ सिंगासने यांनी लॉक डाऊन काळात लिहिण्यात आलेल्या तोचि एक रामदास ही नाट्य पुस्तिका व शांताबाईचे कार्ट असे दोन पुस्तकांचे प्रकाशन शासकीय विश्रामगृह पेण येथे करण्यात आले. या आधी सुद्धा त्यांची अनेक विषयावर विविध पुस्तके प्रकाशित झाली आहेत. बाळ सिंगासने हे दिपश्रीया साप्ताहिकाचे संपादक देखील आहेत. पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास काँग्रेस शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, मराठी पत्रकार परिषदेचे कोकण विभागीय सचिव विजय मोकल, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, सुनिल पाटील, नरेश पवार, कमलेश ठाकूर, राजेश कांबळे, संतोष पाटील, दीपक लोके, विनायक पाटील, प्रकाश माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

## बेकायदेशीररित्या देशी दारू जवळ बाळगल्यामुळे कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीरपणे विनापरवाना देशी दारू जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात कारवाई करून त्याच्याकडून दारूसाठा हस्तगत केला आहे.

सोमटणे येथे राहणारे लक्ष्मण मेढेकर (वय-३२) याच्याकडे देशी दारूचा साठा बेकायदेशीररित्या असल्याची माहिती वपोनि रविंद्र दौंडकर यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राम गोपाळ, नितीन बडगुजर, पोहवा चिकणे, महेश धुमाळ आदींच्या पथकाने सदर इसमास ताब्यात घेऊन त्याच्याकडून देशी दारूच्या दहा बाटल्या हस्तगत केल्या आहेत व त्याच्याविरूद्ध महाराष्ट्र पोलिस दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे कारवाई केली आहे.

## ए.आय.सी. टी.ई./एम.आय.सी यांच्या तर्फे राष्ट्रीय स्तरावर टॉयकॅथान २०२१ हि स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतातील खेळणी उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी ए.आय.सी. टी.ई./एम.आय.सी यांच्या तर्फे राष्ट्रीय स्तरावर टॉयकॅथान २०२१ या स्पर्धेच्या अंतिम फेरी नुकतीच संपन्न होऊन याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

संपूर्ण स्पर्धेचे आयोजन शिक्षण मंत्रालयाच्या सहकाराने, महिला व बालविकास मंत्रालय, सूचना व प्रसारण मंत्रालय. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, लघु व माध्यम उद्योग मंत्रालय आणि वस्त्रउदयोग मंत्रालय यांच्या संयुक्त सहभागाने करण्यात आले. डिजिटल स्वरूपात पार पडलेल्या या स्पर्धांच्या अंतिम फेरीसाठी देशभरातील अनेक केंद्रांमध्ये नवीन पनवेलच्या पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची निवड करण्यात आली या स्पर्धेचा सांगता समारंभ ऑनलाईन पार पडला.

यासाठी सन्माननीय अतिथी पद पिल्लई एच.ओ.सी. कॉलेज रसायनाचे प्राचार्य डॉ. मॅथ्यु जोसेफ व मुख्य अतिथी पद मुंबई विद्यापीठाचे डॉ. उकरांडे यांनी भूषविले. पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या अध्यापिका रुचिरा पाटोळे यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. संदीप जोशी यांच्या सुरवातीच्या निवेदना नंतर डॉ. मॅथ्यू जोसेफ व डॉ. उकरांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राध्यापक डॉ. अविनाश वैद्य यांनी सर्वांचे आभार मानले.

राव साहेब

अ‍ॅड.कविता क. मोरे

### जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात पनवेल

चौ.अर्ज नं.४३६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०१/०९/२१

१) श्रीमती.सुनंदा जयदेव बहिरा
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) मास्टर पार्थ जयदेव बहिरा
तर्फे पालनकर्ती आई श्रीमती.सुनंदा जयदेव बहिरा
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही राहणार : केएल-५/१४, रुम नं.०६,
सेक्टर ३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८ अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील मयत श्री.जयदेव वसंत बहिरा यांचे निधन एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, नवी मुंबई येथे दि.२०/६/२०२० रोजी झाले. श्री.जयदेव वसंत बहिरा यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन-१**

**१००% हिस्सा फ्लॅट नं.१०२, पहिला मजला, गोविंद स्मृती, सर्व्हे नं.१५८ ए, पारडी नं.९३ बी, तक्का, ता.पनवेल, जि.रायगड**

**रक्कम रु.४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र)**

**मिळकतीचे वर्णन-२**

**५०% हिस्सा केएल-५/१४, रुम नं.०६, सेक्टर-३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१८**

**रक्कम रु.९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख मात्र)**

**एकूण रक्कम रु.१३,००,०००/- (अक्षरी रुपये तेरा लाख मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०७ माहे जुलै २०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## उघाडीच्या लिलावाची नोटीस न मिळाल्याने पुन्हा लिलाव करा ; धोंडपाडा शेतकऱ्यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण तालुक्यातील २७ ग्राम पंचायत हद्दीतील उघाड्यांचा लिलाव करण्याबाबतच्या नोटीस खारलँड विभागाकडून बजावण्यात आल्या होत्या, मात्र तालुक्यातील उंबर्डे ग्राम पंचायत मध्ये ही नोटिसच पोहोचली नसल्याने या ग्राम पंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना सदर लिलावामध्ये सहभाग घेता न आल्याने हा लिलाव पुन्हा करण्याची मागणी धोंडपाडा गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

२२ ते २८ जून रोजी खारलँड विभागाच्या कार्यालयात अनेक गावांच्या उघड्यांबाबत लिलावाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. या गावांमध्ये उंबर्डे ग्राम पंचायत हद्दीतील तीन शेतकऱ्यांनी देखील सहभाग घेतला होता. दुपारी ११ च्या दरम्यान धोंडपाडा गावातील उघाडीचा लिलाव होता, त्याप्रमाणे ३ शेतकरी उपस्थित असल्याने ही लिलावाची प्रक्रिया अधिकाऱ्यांनी पूर्ण केल्यानंतर गावातील उर्वरित शेतकऱ्यांना ही बाब समजल्या नंतर आम्हाला लिलावाची नोटिसच मिळालीच नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे आम्ही लिलावापसून वंचित राहिलो आहोत. आमचा मच्छीचा हक्क आमच्या पासून दुरावला गेला आहे, त्यामुळे हे उघाडीचे लिलाव पुन्हा एकदा रीतसर व्हावे अशा प्रकारच्या मागणीचे पत्र धोंडपाडा गावातील शेतकऱ्यांनी खारभूमी विकास अधिकारी अर्जुन कोळी यांना दिले आहे.

याबाबत अर्जुन कोळी यांना विचारले असता, सदर नोटीस ग्राम पंचायत मध्ये कशी पोहोचली नाही याबाबत सर्व चौकशी करण्यात येणार असून शेतकऱ्यांनी केलेल्या मागणी प्रमाणे सदर मागणीच्या आधारे ग्राम पंचायत कार्यालयाला पत्र देऊन त्यांच्या आलेल्या उत्तराप्रमाणे पुढील आदेश काढण्यात येतील. तसेच जोपर्यंत हा विषय प्रलंबित आहे तोपर्यंत जर काही शेतकऱ्यांच्या जमिनीचे नुकसान झाले तर त्याची भरपाई ठेकेदाराने देण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात येणार आहेत असे सांगितले.

तर धोंडपाडा गावातील शेतकरी संजय भोईर यांनी मागील अनेक वर्षांपासून लिलावद्वारे ही उघाडी ठेकेदाराला दिली जाते, मात्र नेमकी २७ पैकी आमच्याच ग्राम पंचायत मध्ये नोटीस कशी पोहोचली नाही असा सवाल करून आम्हा शेतकऱ्यांना या लिलावापसून दूर ठेवण्याचा हा डाव आम्ही खपवून घेणार नाही. या उघडीचा पुन्हा एकदा रीतसर लिलाव व्हावा अशी आम्ही निवेदनाद्वारे मागणी केली आहे असे सांगितले.

## दोन आठवड्यांच्या विश्रांतीनंतर श्रीवर्धन मुसळधार पावसाला सुरुवात

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दोन आठवडे विश्रांती घेतल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांचे तोंडचे पाणी पळाले होते. भातशेतीत आलेले आवण लावणी योग्य झाल्याने शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नांगरणी करून मातीची फोड देखील करून ठेवली होती. परंतु पावसाने दडी मारल्यामुळे लावणीची कामे पूर्ण होऊ शकली नाहीत.

काही शेतकऱ्यांनी शेतात पाणी होते तोपर्यंत लावणीचे काम केले. परंतु लावणी केलेले भात जगेल की करपून जाईल या भीतीने शेतकरी चिंताग्रस्त झाला होता. तर काही शेतकऱ्यांनी शेतामध्ये पाणीच नसल्यामुळे लावणीची कामे बाजूला ठेवली होती. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार आज दुपारपासून तालुक्यामध्ये मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आता शेतामध्ये पाणी तुंबून शेतकऱ्यांना लावणी करणे शक्य होणार आहे. पंचागिय शास्त्रानुसार सध्या पुष्य नक्षत्र सुरू आहे. या नक्षत्राचे वाहन उंदीर असून, उंदराला पाऊस कमी चालतो असे बुजुर्ग लोक सांगतात. तर या नक्षत्राला पोरांचे नक्षत्र असेही म्हणतात.

१९ जुलै रोजी पुनर्वसु नक्षत्र निघत असून याचे वाहन घोडा आहे. या नक्षत्राला म्हाताऱ्याचा पाऊस म्हणतात. जूनच्या सुरुवातीला पावसाने जोरदार हजेरी लावत सर्वत्र पाणी तुंबण्याचे प्रकार देखील घडले होते. अतिवृष्टीमुळे काही शेतकऱ्यांच्या शेतात पेरलेले भात कुसून गेल्या मुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. मात्र अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे कृषी विभाग किंवा महसूल विभागाकडून अद्याप पंचनामे करण्यात आलेले नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. पावसाने दडी मारल्यामुळे दिवसभर मे महिन्याप्रमाणे कडक ऊन पडत होते.

त्यामुळे हवेमध्ये उष्म्याचे प्रचंड प्रमाणात वाढले होते. पहिला पाऊस पडून गेलेला असल्यामुळे जमीन ओली होती. त्यामुळे हवेतील सापेक्ष आर्द्रता जास्त असल्याने उष्म्याच्या त्रासाबरोर घाम येण्याचा त्रास देखील नागरिकांना सोसावा लागत होता. आज दुपारपासून पावसाने मुसळधार सुरुवात केल्यामुळे हवेत चांगल्या प्रमाणात गारवा आला आहे. उष्म्याने त्रासलेल्या नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. मुसळधार पडत असलेल्या पावसामुळे बळीराजा देखील सुखावलेला पाहायला मिळत आहे.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग, यांचे कार्यालय**
**शुक्रतारा बिल्डींग, तळमजला सतकार प्रेस समोर, पो.ता.अलिबाग, जि.रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ईमेल** : ddr_rgd@rediffmail.com

**(महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ पोटकलम (३) अन्वये अर्जदाराच्या नावे एकतर्फी मानवी अभिहस्तांतरण)**

**श्री गुलमर्ग सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. फायनल प्लॉट क्र.२७०, सब प्लॉट क्र.४, उरण रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड. मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयंस बाबत) जाहीर नोटीस**

१) श्री.मुल्ला मोहम्मद युसुफ अब्दुल हमीद, (जागा मालक) रा.मु.पो. ता.पनवेल, जि.रायगड २) श्री.मुल्ला अब्दुल मजीद अब्दुल हमीद (जागा मालक) रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड, ३) श्री.मुल्ला मोहम्मद नुर अब्दुल हमीद (जागा मालक) रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड ४) श्री.मुल्ला मोहम्मद सईद अब्दुल हमीद (जागा मालक) रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड, ५) श्री.मुलला सगीर मेहमुद अब्दुल हमीद (जागा मालक) रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड. श्रीमती बिल्कीस बेगम अब्दुल वहाब दौनॅक, (जागा मालक) रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड, ७) श्रीमती.अखरुन्नीसा अब्दुल रेहमान तुगेकर, (जागा मालक), ८) श्रीमती.मोहसिना अब्दुल समद खतीब (जाागा मालक), ९) श्रीमती.नादिरा मोहम्मद अरि ठाकूर, १०) श्रीमती.सफिया अब्दुल हमीद मुल्ला (जागा मालक) सर्व रा.मु.पो.ता.पनवेल, जि.रायगड, ११) मे.राणा कन्स्ट्रक्शन (विकासक) सिरा....शन रुम नं.५५, तिसरा मजला, २ री पीरखान स्ट्रटी, मुंबई यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे कार्यालयात महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियम ११ अन्वये खालील मालमत्तेचे मानिव अभिहस्तांतरण करून मिळणे बाबत अर्ज केला आहे. सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून दि.१९/०७/२०२१ रोजी स.११.१५ वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**फायनल प्लॉट क्र.२७०, सब प्लॉट क्र.४, क्षेत्रफळ १०१५.०० चौरस मीटर, मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दि.१७/०७/२०२१ पूर्वी या कार्यालयात दाखल करावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस हजर रहावे अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही कण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०७/०७/२०२१

**सही/-**
**(गोपाळ मावळे)**
**सक्षम प्राधिकारी**
**तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था रायगड-अलिबाग**

राव साहेब

प्रोसेस जमा रु.५०/-

अ‍ॅड.समाधान काशिद, कामोठे
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज नं.५२४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२१

चांदनी दशरथ सिंह उर्फ चांदनी राजेश कुमार
अपार्टमेंट नं.LIG-II/A/51, तळमजला,
प्लॉट नं.२ ई/२ ए आणि २ ई, सेक्टर नं.२ ई,
गट नं.१२८/सी, कळंबोली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड अर्जदार

विरुद्ध

कांचन एस सिंह आणि शांतीदेवी लालबहादूर सिंग
दोघेही रा.अपार्टमेंट नं.LIG-II/A/51, तळमजला,
प्लॉट नं.२ ई/२ ए आणि २ ई, सेक्टर नं.२ ई,
गट नं.१२८/सी, कळंबोली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड सामनेवाले

ज्याअर्थी कै.ठाकूर दशरथ सिंह उर्फ दशरथ लालबहादूर सिंग हे दिनांक १८/०७/२०१८ रोजी श्री हॉस्पिटल, कामोठे येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**१) अपार्टमेंट नं.** LIG-II/A/51, **तळमजला, इमारतीचे नांव : अपार्टमेंट नं.**LIG-II/A/51, **तळमजला, प्लॉट नं.२ ई/२, सेक्टर नं.२ ई, कळंबोली, ता.पनवेल, जिल्हा : रायगड. त्याचे क्षेत्रफळ १३.५२ चौ.मी.**

**२) गाळा नं.०६, तळमजला, श्री कृष्ण पॅलेस को.ऑप.हौ.सोसा.लि., प्लॉट नं.०३, सेक्टर नं.१६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड त्याचे क्षेत्रफळ २८.४०० चौ.मी. चटई क्षेत्र व लॉफ्ट क्षेत्र ९.४०० चौ.मी. यामध्ये ५० टक्के हिस्सा**

कै.ठाकूर दशरथ सिंह उर्फ दशरथ लालबहादूर सिंग यांस अर्जदार व प्रतिवादी हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार व सामनेवाले यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.७/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

श्री.भाकरे सो.कोर्ट

अ‍ॅड.मिलींद भोसले
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०८/२१

१) श्रीमती.रेश्मा रामदास मगर
लग्नानंतरचे नाव सौ.रेश्मा अभिजीत देशमुख
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.४५०/१, यशोदा कुंज उषःकाल सोसायटी जवळ,
अभिनव नगर, जुनी सांगवी, पुणे ४११०२७
२) श्रीमती.सुवर्णा रामदास मगर
वय : ६६ वर्षे, धंदा : घरकाम
३) श्री.राजन रामदास मगर
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्रं.२ व ३ रा.सहाणगोठी,
कुरुळ, ता.अलिबाग, जि.रायगड
४) कविता रामदास मगर
लग्नानंतरचे नाव सौ.कविता प्रशांत वाडेकर
वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम
रा.१०१, बी विंग, एम्बसी, भक्ती पार्क,
माणिक आगार जवळ, वडाळा, मुंबई-३७ अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार १) अर्जदार क्र.१, ३ व ४ चे वडील व अर्जदार क्र.२ यांचे पती कै.रामदास काशिनाथ मगर यांचे निधन दि.१४/०२/२०१३ रोजी मुंबई येथे झाले. यांना हिंदू वारसा कायद्याप्रमाणे अर्जदार क्र.१ व ४ ह्या मुली, अर्जदार क्र.३ मुलगा व अर्जदार क्र.२ ह्या पत्नी असे कायदेशीर वारस आहेत. त्याचप्रमाणे कै. रामदास काशिनाथ मगर यांची आई कै.भागिर्थी काशिनाथ मगर ह्या देखील दि.२५/१०/२००५ रोजी मौजे : सहाणगोठी, ता.अलिबाग, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.रामदास काशिनाथ मगर यांना वरील अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत.

२) श्रीमती.रेश्मा रामदास मगर लग्नानंतरचे नाव सौ.रेश्मा अभिजीत देशमुख व कै.रामदास काशिनाथ मगर यांनी दोघांनी मिळून मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकत खरेदी खताने विकत घेतली होती. तीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.सी-१४०१, हावरेज तुलसी, बी विंग, प्लॉट नं.५२, सेक्टर ९, नवीन पनवेल, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ५७३.६४ चौ.फूट कारपेट व टेरेस क्षेत्र २६.६९ चौ.फूट अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

वर अर्जदार हे कै.रामदास काशिनाथ मगर यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.रामदास काशिनाथ मगर यांचे वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. आज दि.७/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात तिघा जणांचा मृत्यु झाल्याची घटना घडली आहे.

कामोठे ब्रीज संपल्यानंतर मुंबईक्रडे जाणाऱ्या लेनजवळून समीर अबिद हुसेन शेख (वय-१९, रा.-चेंबूर) हा त्याच्या ताब्यातील डिओ स्कूटी घेऊन पनवेल बाजूकडून चेंबूर येथे जात असताना त्याची मोटारसायकल स्लीप झाल्याने तो खाली पडला व त्यास डोक्यास, छातीस दुखापत झाल्याने कामोठे एमजीएम हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान त्याचे निधन झाले आहे.

तर दुसऱ्या घटनेत पनवेल टि पॉईंट ते कळंबोली सर्कलच्या दरम्यान सर्व्हिस रोडवरून भरधाव स्पोर्ट्स बाईक घेऊन यश तिजारे (वय-२५) व संकेत शिंदे (वय-२५) हे दोघे जात असताना यशचे बाईकवरील नियंत्रण सुटल्याने त्यांची बाईक फुटपाथवर चढून इलेक्ट्रीक पोलला धडकली यात दोघेही खाली पडून जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यु झाला आहे. या तिन्ही अपघाताची नोंद कामोठे पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.गोडसे मॅडम

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७७२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०८/२१

१) शेहनाज अब्दुल्लाह पटेल
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सोएब अब्दुल्लाह पटेल
वय : २९ वर्षे, धंदा : शेती
३) सौबान अब्दुल्लाह पटेल
वय : २६ वर्षे, धंदा : शेती
४) सुफियन अब्दुल्लाह पटेल
वय : ३१ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.अब्दुल्लाह पटेल हाऊस, ६२/२,
नौमानी मजिद जवळ, तळोजा पाचनंद,
ता.पनवेल, जि.रायगड
५) सुमैय्या झामीर पटेल
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
घर नं.१३४, राईस मिल जवळ,
तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल हे दि.२१/०१/२०२१ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत.

पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल यांच्या ताबेकब्जातील व कुटुंबातील वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पेंधर, तळोजा, रोडपाली व ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकती**

| अ.क्र. | मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पेंधर | ४ | ४५ | ० | ०-१५-० | २.०० |
| २ | | | ५० | ० | १-१३-० | ९.०० |
| ३ | | | ५१ | ० | १-१७-० | १.०० |
| ४ | | | ५२ | ० | ५-०२-८ | १.०० |
| ५ | | | १५४ | २ | ०-२१-४ | २४.०० |
| ६ | | | १५२ | ० | ०-३३-१२ | |
| ७ | पेंधर | ४/अ | ८१ | ० | २-४-९ | ७.०० |
| ८ | | | ८७ | ० | ०-६८-५ | ३.६२ |
| ९ | | | ८८ | ० | ०-२०-४ | ०.६९ |
| १० | | | १०२ | ० | ०-८९-८ | ७.०६ |
| ११ | | | ५७ | ३ | ०-२७-० | १.०६ |
| १२ | पेंधर | ४/ब | ८४ | ० | ०-२७-१ | १.१९ |
| १३ | | | ९० | ० | ०-४४-३ | २.०६ |
| १४ | | | ९३ | ० | १-११-३ | ७.३७ |
| १५ | | | ५४ | १ | ०-१२-० | ०.५९ |
| १६ | | | ५५ | ० | ०-१५-४ | २.०६ |
| १७ | | | ५६ | ० | ०-१८-५ | २.३१ |
| १८ | | | ५७ | १ पै | ०-८५-४ | २.९४ |
| १९ | | | ५७ | २ | ०-०२-० | ०.२२ |
| २० | पेंधर | ४/क | १०० | ० पै | ०-८६-३ | १०.०६ |
| २१ | | | १०४ | ० पै | ०-४०-२ | ४.८७ |
| २२ | | | १०५ | ० | ०-५७-३ | ६.४० |
| २३ | | | १०८ | ० पै | ०-०९-९ | ०.६४ |
| २४ | | | ८९ | ० | ०-५८-० | ३.३७ |
| २५ | पेंधर | ४/ड | ९१ | ० | १-९९-३ | १९.२५ |
| २६ | | | ९२ | ० | १-८०-१ | ११.४४ |
| २७ | तळोजा | ३८ | ७३ | १ | ०-३०-० | ४.९४ |
| २८ | रोडपाली | ४०/१ | १४४ | १ | ०-३९-१ | २.१९ |
| २९ | | ४०/२ | १२१ | ७ | ०-२२-३ | २.७५ |
| ३० | | ४०/३ | १२१ | ३ | ०-३६-० | ६.३१ |
| ३१ | | ४०/४ | २०१ | ४ | ०-१७-० | ३.४४ |
| ३२ | | ४०/५ | २२१ | ५ (१) | ०-८-६ | ०.०६ |
| ३३ | | ४०/६ | १४४ | २ | ०-१६-० | २.५६ |
| ३४ | | ४०/७ | १२१ | १ | ०-५६-६ | ९.७५ |
| ३५ | | ४०/८ | १६१ | २ | ०-११-६ | १.३१ |
| ३६ | | ४०/९ | २०१ | २ | ०-०८-६ | १.१९ |
| ३७ | | | २०१ | १ | ०-०९-४ | १.३७ |
| ३८ | ओवे | १२ (१) | ६१ | ५+६ अ+२ सी | ०-७-१२ | |
| ३९ | | | ७२ | ४+६ | ३-३-० | |
| ४० | | | १११ | २+४ अ | ०-१९-१२ | |
| ४१ | रोडपाली | ३ अे (१४) | ३६३ | ७ | ०-४-८ | ०.५९ |
| ४२ | | | ३६३ | ८ | ०-३-३ | ०.५४ |
| ४३ | | ४ अे (४२) | ४२ | ४ | ०-२२-८ | ४.१३ |
| ४४ | | ३ अे (२१) | ४२ | २ (१) | ०-३-० | ०.५० |
| ४५ | | ३ अे (२४) | ३९२ | १ | ०-७-१ | १.४४ |
| ४६ | | ३ अे (२८) | ४२९ | १ | ०-२३-१२ | ४.३० |
| ४७ | | ३ बी (१) | ३०२ | १ बी | ०-१-८ | |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल यांचे वारसदार या नात्याने पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील पै.अब्दुल्लाह अब्दुल लतिफ पटेल यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.८/७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## लोकल मधील प्रवाशाला मारहाण करुन मोबाईल फोनची लुट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हार्बर रेल्वे मार्गावरुन मानखुर्द ते पनवेल असा प्रवास करणाऱ्या तरुणाला दोघा लुटारुंनी चालत्या लोकलमध्ये मारहाण करुन त्याच्याजवळचा मोबाईल फोन लुटून खारघर रेल्वे स्थानकात धावत्या लोकलमधुन उडी टाकून पलायन केल्याची घटना घडली असून या लुटारुंच्या मारहाणीत तरुण जखमी झाला असून पनवेल रेल्वे पोलिसांनी या घटनेतील दोघा लुटारु विरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील तक्रारदार तरुणाचे नाव कृपाशंकर यादव (१९) असे असून तो मुळचा मध्यप्रदेश राज्यातील आहे. कृपाशंकर हा पनवेल येथे नातेवाईकांकडे जात होता. त्यामुळे त्याने पावणे एक वाजण्याच्या सुमारास मानखुर्द रेल्वे स्थानकातुन पनवेल लोकल पकडली होती. वाशी रेल्वे स्टेशन जवळ त्याला झोप लागली. दरम्यान, सदर लोकल खारघर रेल्वे स्थानकात आल्यानंतर कृपाशंकर असलेल्या लोकलच्या डब्यात दोघे लुटारु चढले. त्यांनतर दोघा लुटारुंनी झोपेत असलेल्या कृपाशंकरला मारहाण करण्यास सुरुवात केली.

यावेळी एका लुटारुने त्याच्या खिशात असलेला मोबाईल फोन जबरदस्तीने लुटण्याचा प्रयत्न केल्याने कृपाशंकरने त्याला विरोध केला. त्यामुळे सदर लुटारुने त्याच्या हातातील कड्याने कृपाशंकरच्या डोक्यात मारुन त्याला जखमी केले. त्यानंतर दोघा लुटारूंनी त्याचा मोबाईल लुटून खारघर रेल्वे स्थानकात धावत्या लोकलमधून उडी टाकून पलायन केले. यावेळी लोकलने वेग घेतल्याने कृपाशंकर याने मानसरोवर रेल्वे स्थानकात उतरुन त्याठिकाणी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या मदतीने पनवेल ग्रामीण रुग्णालयात उपचार घेऊन पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार रेल्वे पोलिसांनी दोघा लुटारुंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

## १८ते ४४ वयोगटातील लसीकरणाला सुरुवात करण्यात यावी : अविनाश शिंदे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेऊन मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात १८ ते ४४ वयोगटातील लसीकरणाला सुरुवात करण्यात यावी. अशी मागणी नांदगाव मजगांव पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने उसरोली ग्रामपंचायत तंटामुक्त गाव समिती सदस्य अविनाश शिंदे यांनी केली आहे.

कोरोना रोगाच्या पार्श्र्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात ४५ वर्षांवरील नागरिकांना लसीकरण मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेला पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्तम प्रकारे प्रतिसाद मिळाला. राज्यात कोरोना रोगाच्या पार्श्र्वभूमीवर तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या आरोग्य विभागाने नांदगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात १८ ते ४४ वयोगटातील लोकांसाठी लसीकरणाला सुरुवात करण्यात यावी. अशी मागणी पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने अविनाश शिंदे यांनी केली आहे.

# चिल्हे येथे पावसात गुरांचा गोठा कोसळला ; दहा गुरे बचावली

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

आठवड्याभराच्या विश्रांतीनंतर ७ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास पावसाने पुन्हा सुरवात करताच एका शेतकऱ्याचा गुरांचा गोठा या पावसात गारद झाला मात्र सुदैवाने मालक दत्ता सुटे व त्यांच्या कुटूंबियांच्या अथक प्रयत्नातून तब्बल दहा गुरांचे प्राण वाचल्याची घटना घडली गुरुवारी पहाटे चिल्हे येथे घडली असून या बाबतची सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

रोहा तालुक्यातील मौजे चिल्हे येथील गरीब शेतकरी व पशु पालन करणारे दत्ता दामोदर सुटे यांचा गुरांचा गोठा ८ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास जोरदार झालेल्या पावसात अचानकपणे घरलागत असलेला गुरांचा गोठा गारद झाला दैव बलवत्तर मालक दत्ता सुटे आणि त्यांच्या कुटूंबियाने मोठ्या शर्तीने आपले जीव धोक्यात घालत या गोठ्यातील दहा गुरांचा जीव वाचवण्यात यशस्वी ठरले असून सर्वत्र एकच



खळबळ माजली आहे.

सदर याबाबत सविस्तर माहिती अशी की मालक दत्ता सुटे हे पहाटे गाई व म्हशींचे दूध काढण्याकरिता नेहमीच्या वेळेनुसार गुरुवारी सकाळी उठले दूध काढण्या आधी गुरांना चारा घालण्यास गोठ्यात गेले पहाटे पाचच्या सुमारास जोरदार पाऊस सुरू होता. ते गुरांना चारा घा-लता घालता त्यांना गोठ्यातीवरील छप्परावरील कवले हलण्यास सुरवात होत त्याचे वासे मोडत आहेत असे आवाज येताक्षणीच त्यांनी आपल्या पत्नी आणि कन्या यांना आवाज देत सर्व गुरांच्या गळ्यातील बांधलेली रस्सी (दावे) ताबडतोब तोडले यांनी गुरांपाठोपाठ ते ही सुखरूप गोठ्यातून बाहेर पडताच गोठा काही क्षणातच गारद होण्याची घटना घडली. दत्ता सुटे यांनी आपल्या शेतीला पूरक व्यवसाय म्हणून आपल्या रोजीरोटीसाठी वडिलोपार्जित गाई म्हशी गुरांचे पालन करत दुग्धव्यवसाय करीत आहेत. परंतू मागील गेली आठवडाभर पावसाची विश्रांतीनंतर बुधवारी रात्री अचानकपणे जोरदार झालेल्या पावसात त्यांच्या गुरांचा गोठा जमिनदोस्त तसेच गुरांची वैरण कौले व शिवार यांचे खूप मोठे नुकसान झाले असल्याने सुटे त्यांच्यावर मोठे संकट निर्माण होऊन उपासमारीची वेळ आली आहे. दत्ता सुटे यांच्यावर कोसळलेल्या आपत्तीची लवकरात लवकर शासकीय पातळीवर दखल घेऊन जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी सर्वच स्तरातून होत आहे.

## संघटनेच्या नामफलक अनावरणाची हॅट्रीक; कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाची कमाल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगार क्षेत्रातील ढाण्यावाघ अशी ज्यांची ख्याती आहे, असे कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचा दबदबा आज खोप-ोली व रसायनीतील कामगारांना पहायला मिळाला. दि.७ जुलै २०२१ रोजी एकाच दिवशी तब्बल ३ ठिकाणी न्यू मॅरीटाईम अॅन्ट जनरल कामगार संघटनेचे नामफलक अनावरण कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आले. पनवेल तालुक्यातील रसायनी येथील बिर्ला कार्बन तर खोपोली येथिल प्रसोल केमिकल्स व केडल रन-वेज होणाड या कंपन्यातील कामगारांनी व्यवस्थापनाच्या जाचाला कंटाळून व मनमानी कारभारला कंटाळून महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्विकारले.

तिनही कंपन्यांतील मुजोर व्यवस्थापन या कामगारांना संघटनेचे नामफलक लावण्यास मज्जाव करत होते परंतू महेंद्र घरत यांच्या दमदार एन्ट्रीने सर्वाची हवा निघून गेली व कामगारांमध्ये उस्ताह संचारला. या प्रसंगी आपल्या घणाघाती भाषणात बोलताना महेंद्रशेठ घरत म्हणाले की, या कामगारांवर होणारा अन्याय कदापीही सहन केला जणार नाही. या मुजोर कंपनी मालक व व्यवस्थापनास वठणीवर आणून कामगारांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळवून दिल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही असे त्यांनी यावेळी ठणकावले. संघटनेने कोवीड काळात मागील दिड वर्षापासुन केलेल्या कार्यामुळे संघटनेकडे विविध कंपन्यांतील कामगारांची रांग लागली आहे. कित्येक कंपन्यांचे नामफलक अनावरण करणे बाकी आहे.

या कार्यक्रमासाठी खालापूर तालुका काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष नाना म्हात्रे, खालापूर कॉ. क. कार्याध्यक्ष कृष्णा पारंगे, संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील, महाराष्ट्र इंटकचे उपाध्यक्ष विनोद म्हात्रे, रा. जि. इंटकचे अध्यक्ष किरीट पाटील, उपाध्यक्ष अमीरभाई खान, उ. ता. इंटकचे अध्यक्ष सजंय ठाकूर, प.ता.इंटकचे अध्यक्ष दिपक ठाकूर, म.प्र.युवक कॉ. सचिव निखिल डवले, खोपोली महिला कॉ. अध्यक्षा सौ. रेखाताई जाधव, जेष्ठ नेते अण्णा गावडे, रण ता. युवक इंटक अध्यक्ष राजेंद्र भगत, संघटनेचे संघटक योगेश रसाळ, अरूण म्हात्रे, विवेक म्हात्रे, आदित्य घरत, अलंकार पाटील, हरेश पाटील, सुरेश पाटील, देवेंद्र पाटील व सर्व कंपन्यांतील कामगार उपस्थित होते.

## पालकमंत्री आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

गुरुवार दि.०८ जुलै २०२१ रोजी सोईनुसार सुनिती शासकीय निवासस्थान येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि.०९ जुलै २०२१ रोजी सकाळी १०.३० वा. सुतारवाडी निवासस्थान येथून शासकीय वाहनाने मांदाड ता.तळाकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. मांदाड येथे आगमन व प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ११.३० वा. रोवळा नळपाणी पुरवठा योजना भूमिपुजन कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : रोवळा ता.तळा. दुपारी १२.०० वा. तळा येथे आगमन व महिला बाल कल्याण विभाग, जि.प.अलिबाग यांच्यामार्फत साहित्य वाटप. स्थळ : तळा पंचायत समिती कार्यालय, तळा. दुपारी १.०० वा. तळा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. दुपारी १.३० वा. सुतारवाडी येथे आगमन व राखीव. सायं.४.३० वा.सुतारवाडी येथून शासकीय वाहनाने गोवे ता.रोहाकडे प्रयाण. सायं.५.०० वा. १५ व्या वित्त आयोगामार्फत शुध्द पेयजल प्रकल्प ठ.ज वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : गोवे, ता.रोह. सोईनुसार गोवे, ता.रोहा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडीकडे प्रयाण. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

## तळोजा येथून मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गाडीच्या गिअर लिव्हरच्या वरील भागावर ठेवलेला मोबाईल हँडसेट तेथेच काम करणाऱ्या एका इसमाने चोरून नेल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमधील बेलनाका येथील रिक्षा स्टँडजवळ असलेल्या गतिरोधकाजवळ घडली आहे.

गुरजर सिंग जोगेंदर सिंग भुल्लर (वय-५२) हे कंपनीच्या टाटा एस या गाडीवर चालक असून त्या कंपनीत कामाला असणाऱ्या दिनेश पवार हा वाहनातील मालाची चढ-उतार करण्यास कामास आहे.

भुल्लर हे वाहन चालविताना त्यांनी वाहनाची गती कमी केली असता आरोपी दिनेश पवार याने त्यांचा ३ हजारांचा मोबाईल चोरून नेल्याची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल कार्यक्षेत्रातील कोरोना चाचण्यांचे प्रमाण वाढविणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविडचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्यासाठी आरटीपीसाआर चाचण्यांचे प्रमाण वाढविण्याचे आदेश आज आयुक्त श्री. गणेश देशमुख यांनी दिले. याची प्रभावी अमंलबजावणी करण्याकरिता आज(८ जुलै) महापालिकेमध्ये उपायुक्त सचिन पवार, मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

लॉकडाऊनचे नियम शिथिल झाल्यापासून अनेकवेळा नागरिक विनाकारण फिरत असल्याचे दिसून येत आहे. दुसरी लाट ओसरत असली तरीही अजून संपलेली नाही. मागील महिन्यात पॉझीटिव्ह येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झाली होती मात्र गेल्या काही दिवसापासून ही संख्या पुन्हा वाढताना दिसत आहे. डेल्टा प्लस उत्परिर्वतित विषाणूचा धोकाही वाढला आहे. एकूणच साऱ्या पार्श्वभूमीवर कोरोना चाचण्याचे प्रमाण वाढविण्याच्या सूचना आयुक्त श्री. गणेश देशमुख वैद्यकिय आरोग्य विभागास दिल्या आहेत.

संभाव्य तिसऱ्या लाटेची सगळीकडे चर्चा सर्वत्र सुरू असताना महापालिकेने देखील पूर्वतयारी सुरू केली आहे. यानुसार आज झालेल्या बैठकित पनवेल कार्यक्षेत्रातील पनवेल, न्यू पनवेल,कामोठे, कळंबोली, खारघर, तळोजा या नोडमधील लोकसंख्येच्या प्रमाणानूसार चाचण्या करण्यात येणार आहे. या नोडमधील गर्दीची ठिकाणे, बाजार,रेल्वे स्थानके, बस स्थानके, कंटेन्मेंट झोन अशा ठिकाणी आरटीपीसीआर चाचण्या वाढविण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

संबधित प्रभाग अधिकारी प्रभागाचे कंमाडिंग आफीसर असल्याकारणाने त्यांनी पोलिस विभागाशी समन्वय साधून सर्व नोडमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी कोरोना चाचण्या करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. यानुसार या बैठकित नियोजन करण्यात आले. या बैठकिस वैद्यकिय अधिकारी, सर्व प्रभाग अधिकारी, सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कोरोना चाचण्या करणाऱ्या मोबाईल टिमचे समन्वयक डॉक्टर्स उपस्थित होते.



---

मा.गोडसे मॅडम

अर्जदाराचे वकील
ॲड.जान्हवी वाडकर-गोगटे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६९२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०८/२१

१) श्री.गणेश माया म्हात्रे
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.५३८, हनुमान आळी न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
२) गुलाब गणू ठाकूर
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.४७९, न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.रामचंद्र माया म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.विश्वनाथ माया म्हात्रे
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.१८३, न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.बाबुलनाथ माया म्हात्रे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.३०७, तिसरा माळा, गोविंद धाम को.ऑप.
हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.२७८/बी, लक्ष्मी आय
क्लिनिकच्या पाठीमागे, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.माया मुकूंद म्हात्रे हे दि.२७/०७/२०२० रोजी मयत झाल्याने अर्जदार यांनी कै.माया मुकूंद म्हात्रे यांचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ३५८ | १ ए | १५९ | ०-०५-३ |
| | १ ए | २३० | ०-०२-५ |
| | १ ए | २६७ | ०-०६-१ |
| ३५८ | ए | ५३ | ०-४२-० |
| | १ ए | १०६ | ०-४१-० |
| | १ ए | १३१ | ०-०८-६ |

अर्जदार हे कै.माया मुकूंद म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.माया मुकूंद म्हात्रे यांच्या वारस-पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
दि.०८/०७/२०२१
पनवेल

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

### PUBLIC NOTICE

**Mr.Darshan Premchand Singh Office : A-wing 601-606, Groma House, Plot No.14 (C), Sector-19, Vashi, Navi Mumbai-400703** here by publish notice in view to know to the public at large that we posses and or are otherwise sufficiently entitile to the landed properties being the non-agriculture plot of land being, laying & situated and at revenue **village-Vihighar, Tal-Panvel, Dist-Raigad,** Which is described in the revenue record as follows :-

| Sr.No. | Survey No./Gut No. | Area in Sq.Mtrs |
|---|---|---|
| 1 | 16/12/1 | 2400 Sq.Mtrs. |

The competent authority i.e.Associate Planner (NAINA) CIDCO has given permission to us to construct/erect various buildings on the said property vide their letter **dated 21/01/2020 bearing no.CIDCO/NAINA/PANVEL/VIHIGHAR/BP-00505/CC/2019/0024** Town Planning Authority ie.associate planner (NAINA) CIDCO has issued Commencement Certificate vide his letter **dated 21/01/2020 bearing no.CIDCO/NAINA/PANVEL/VIHIGHAR/BP-00505/CC/2019/0024.** We therefore in view make it to be known to the public at large hereby publish the relevant information relating our said project, Which is as follows.

| | |
|---|---|
| **Name and Address of the Owner/developer** | **Mr.Darshan Premchand Singh A-wing 601-606, Groma House, Plot No.14 (C), Sector-19, Vashi, Navi Mumbai-400703** |
| **Name and Address of the Contractor description of Property.** | **Classic Constructions, Shop No.3, Siddhivinayak Apartment, Plot No.205/206, Sec-19, Koperkhairane** |
| **Order number and date of grant of development permission.** | **CIDCO/NAINA/PANVEL/VIHIGHAR/BP-00505/CC/2019/0024** |
| **Order number and date of Commencement Certificate.** | **CIDCO/NAINA/PANVEL/VIHIGHAR/BP-00505/CC/2019/0024** |
| **Permitted Floor Space Index (F.S.I)** | **Permissible F.S.I.-0.5** |
| **Number of Permises & their total area Premitted** | **In all 28 residential premises are in 2 (Still+3, Still+2) Storied Wings. Total Net Built up area-1096.27 Sq.Mtr.** |
| **Address of the space where copies of detailed approved plans & other relevant documents shall be available for inspection.** | **Mr.Darshan Premchand Singh, Survey No.16/12/1, Village-Vihighar** |
| **Name of Architect** | **A.N.Arch Architect Neha Jain** |
| **Name of Structure Engineer** | **M/s. Adarshila Consultants.** |

---

### जाहीर सूचना

**श्री.दर्शन प्रेमचंद सिंग, पत्ता : ए विंग, ६०१-६०६, ग्रोमा हाऊस, प्लॉट नं.१४ (सी), सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई-४००७०३** जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सूचना देत आहेत.

आमचे नावे, ताबे-कब्जातील, मौजे : विहिघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे महसूल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | सर्वे नं./गट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| १ | १६/१२/१ | २४०० |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर (नैना) **सिडको/नैना/विहिघर/बीपी-००५०५/सीसी/२०१९/००२४ दि.२१/०१/२०२०** द्वारे परवानगी दिलेली आहे. सदर सक्षम नगर रचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोशिएट प्लानर नैना सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. **सिडको/नैना/विहिघर/बीपी-००५०५/सीसी/२०१९/००२४ दि.२१/०१/२०२०** द्वारे कमेंन्समेंट सर्टिफिकेट माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशित करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/विकासकाचे नाव आणि पत्ता | श्री.दर्शन प्रेमचंद सिंग पी.सिंग, पत्ता : ए विंग, ६०१-६०६, ग्रोमा हाऊस, प्लॉट नं.१४ (सी), सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई-४००७०३ |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता मिळकतीचे वर्णन | क्लासिक कंन्स्ट्रक्शन, शॉप नं.३ सिद्धीविनायक अपार्टमेंट, प्लॉट नं.२०५/२०६, सेक्टर १९, कोपरखैरणे |
| विकसनाची परवानगी मंजूर झाल्याचे आदेश क्र. आणि दिनांक | सिडको/नैना/विहिघर/बीपी-००५०५/सीसी/२०१९/००२४ दि.२१/०१/२०२० |
| कमेंन्समेंट सर्टिफिकेट आदेश क्र.आणि दि. | सिडको/नैना/विहिघर/बीपी-००५०५/सीसी/२०१९/००२४ दि.२१/०१/२०२० |
| मंजूर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एफ.एस.आय.) | मंजूर एफ.एस.आय. ०.५ |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजूर क्षेत्र | एकूण २८ सदनिका त्यामध्ये स्टील+३ मजली आणि स्टील+२ मजली च्या दोन इमारती बांधण्याची परवानगी मिळालेली आहे. ज्याचा संपूर्ण बांधीव क्षेत्र १०९६.२७ स्क्वे.मी. |
| मंजूर नकाशे आणि इतर संबंधित कागदपत्रांच्या प्रति संबंधित कागदपत्रांच्या प्रति तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | श्री.दर्शन प्रेमचंद सिंग सर्व्हे नं.१६/१२/१, मौजे : विहिघर, ता.पनवेल, जि.रायगड |
| आर्किटेक्टचे नाव | ए.एन.आर्च, आर्किटेक्ट-नेहा जैन |
| स्ट्रक्चरल इंजिनिअरचे नाव | मेसर्स आदरशिला कन्सल्टंट |